प्रेसनोट

एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव
दिनांक २१/५/२०२५

प्रति,

संपादक

--------------------------

**२ लाख रुपये किंमतीचे मोबाईल फोन चोरी चा गुन्हा एमआयडीसी पोलीस स्टेशन करवी २४ तासात उघडकीस**

तन्वीर मजहर पटेल हे त्यांच्या कुटुंबासह रा नशेमन कॉलनी के जी एन डेअरी जवळ जळगाव येथे राहातात. दिनांक १८/५/२०२५ रोजीचे रात्री ०२-०० ते ०३-०० वाजेच्या सुमारास फिर्यादी हे घरात झोपलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे घराचा बंद दरवाजा उघडुन त्यांचे घरात अनाधिकारे प्रवेश करुन घरातुन २ ॲपल कंपनीचे आयफोन व १ वन प्लस कंपनीचा असे २ लाख किंमतीचे मोबाईल फोन घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेले आहेत. त्याबाबत तन्वीर पटेल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस स्टेशनला ३६३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१(१), ३०५(अ) प्रमाणे दिनांक १९/५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

जळगाव शहरात व जिल्ह्यात होत असलेले मालमत्तेचे गुन्ह्यांना आळा बसावा व मालमत्तेचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत मा पोलीस अधीक्षक डॉ महेश्वर रेड्डी, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, व मा उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव उपविभागी संदीप गावीत यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना नुसार व मार्गदर्शनानुसार एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पो नि संदीप पाटील यांनी सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत डी बी पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले असता डि बी पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे आसपासचे नागरीकांना विचारपुस करुन, गोपनिय बातमीदारांकडुन तसेच सिसिटीव्ही फुटेजचे आधारे माहीती घेतली असता सदरचा गुन्हा घडला त्यावेळी फिर्यादी यांचे घराजवळ एक अल्पवयीन मुलगा फिरत असल्याची माहीती मिळाली. सदर माहीतीचे आधारे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी शहरातील वेगवेगळ्या परीसरात फिरुन चोरी करणारे मुलाबाबत माहीती काढुन एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले असुन त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदर गुन्ह्याचे कबुली दिलेली असुन त्याचेकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेले २ ॲपल कंपनीचे आयफोन व १ वन प्लस कंपनीचा असे २ लाख किंमतीचे मोबाईल २४ तासाचे आत हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरचा गुन्हा एमआयडीसी पोलीस स्टेशनचे डि बी पथकाचे पो उ नि राहुल तायडे , चंद्रकांत धनके, पो हे कॉ रामकृष्ण पाटील, पो कॉ किरण पाटील, छगन तायडे,राहुल घेटे, नितीन टाकुर,योगेश बारी,योगेश घुगे यांनी उघडकीस आणलेल आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो हे कॉ रामकृष्ण पाटील हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय जळगाव